Baramati agro
Linking the Basics

**ANNUAL GENERAL MEETING**

**Day & Date**: Friday, 26th September, 2025

**Time**: 11:00 A.M. (IST) (Meeting started at 11:00 A.M. IST)

**Mode and Deemed Venue:** Through Video Conferencing (ZOOM), At Post Pimpali, Tal. Baramati, Dist. Pune – 413102

**Corporate Participants:**

1) Mr. Rajendra D. Pawar: Chairman and Managing Director
2) Mr. Subhash J. Gulave: Whole-Time Director
3) Mrs. Sushama Mane: Independent Director
4) Mr. Subhash M. Kore: Whole-Time Director & Chief Financial Officer
5) Mr. Devendra V. Kulkarni: Company Secretary

**Statutory Auditor:**

1. CA Parag Pansare – Partner, Kirtane & Pandit, LLP

**Secretarial Auditor:**

1. CS Mahesh Risbud

**Scrutinizer:**

1) CS Hrishikesh Wagh – Partner, KANJ and Co. LLP

• **Welcome Address – Mr. Devendra Kulkarni:**

नमस्कार, मी देवेंद्र कुलकर्णी, आपल्या बारामती ॲग्रो संस्थेचा कंपनी सेक्रेटरी, या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे, संस्थेच्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी जमलेल्या सभासदांचे स्वागत करतो आणि आपल्या संस्थेच्या माननीय चेअरमन साहेबांचे, executive vice chairman. रोहित दादा यांचे व संस्थेच्या संचालक मंडळाचे सदस्य सुभाष गुळवे सर, सुभाष कोरे सर, ऋषिकेश दाभाडे सर, आणि सुषमा माने मॅडम, यांचेही स्वागत करतो...

तसेच संस्थेचे सी.ओ.ओ, श्री. बाबासाहेब सूर्यवंशी सर, आर्थिक सल्लागार, श्री. रोहित मेहेंदळे सर, संस्थेचे स्टॅटयूटरी ऑडिटर, कीर्तने पंडित, चार्टर्ड अकाउंटंट्स यांचे पार्टनर, श्री. पराग

पानसरे सर, सेक्रेटरिअल ऑडिटर, श्री. महेश रिसबूड सर आणि या मीटिंग साठी चे स्क्रूटीनाईझर श्री. ह्रिषीकेश वाघ सर यांचे ही स्वागत करतो.

ही सभा, कंपनी कायद्याच्या आवश्यक त्या तरतुदींचे पालन करून विडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेत आहोत. स्टॅटयूटरी रजिस्टर्स पिंपळी येथील कार्यालयात इन्स्पेक्शन साठी ठेवण्यात आले आहेत.

सभेसाठी आवश्यक असणारी सभासदांची संख्या, म्हणजेच कोरम हा उपस्थित आहे. सभेच्या प्रथे प्रमाणे, सभेच्या नोटिसचे वाचन आपल्यासमोर करत आहे.

## नोटीस

सर्व सभासदांना कळविण्यात येत आहे की, बारामती ॲग्रो लिमिटेड संस्थेची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता, झूम मीटिंग ("व्हिडिओ कॉन्फरन्सिंग") माध्यमातून खालील विषय हाताळण्यासाठी घेण्यात येणार आहे.

## सर्वसाधारण विषय

**१)** संस्थेचे दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजीचे स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय विवरणपत्र तसेच संचालकांचा व हिशेब तपासनिसांचा अहवाल प्राप्त करणे, विचारात घेणे आणि स्वीकारणे.

**२)** प्रेफरेन्स शेअर्स वर (डिविडेंड) घोषित करणे.

**३)** क्रमपद्धतीने निवृत्त होणाऱ्या व पुनःनेमणुकीसाठी संमती दर्शविलेल्या श्री. रोहित राजेंद्र पवार यांची संचालकपदी नेमणूक करणे.

**४)** कीर्तने पंडित, एल.एल.पी., चार्टर्ड अकाउंटंट्स यांची ५ वर्षांकरिता स्टॅटयूटरी ऑडिटर म्हणून नेमणूक करणे.

## विशेष विषय

**५)** किंमत लेखपरीक्षकांचे ३१ मार्च, २०२६ रोजी संपणा-या आर्थिक वर्षाकरिता मानधन ठरविणे.

**६)** सौ. वृषाली राहुल बांदल यांची स्वतंत्र संचालक म्हणून नेमणूक करणे.

**७)** श्री. सुभाष गुळवे यांची संचालकपदी पुनःनेमणूक करणे आणि त्यांचे पदनाम बदलणे.

**८)** श्री. सुभाष कोरे  यांचे पदनाम बदलणे.

**९)** मेमोरँडम ऑफ असोसिएशन मध्ये बदल करणे.

**१०)**श्री. रोहित राजेंद्र पवार यांचे आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी चे  कमिशन ठरविणे.

सभासदांच्या माहितीसाठी, नमूद करत आहे की काही तांत्रिक कारणांमुळे, वृषाली बांदल मॅडम याची स्वतंत्र संचालक पदी होणारी नेमणूक पुढे ढकलण्यात आली आहे, त्यामुळे या विषयवार मतदान घेतले जाणार नाही.

आता, माननीय सुभाष गुळवे सर, यांना विनंती करतो की त्यांनी संस्थेचा आर्थिक वर्ष २०२४-२५ चा आढावा सभेसमोर मांडावा.

• **Financial Overview – Mr. Subhash J. Gulave:**

नमस्कार, मी आपल्या संस्थेचा आर्थिक वर्ष २०२४-२५ चा आर्थिक आढावा आपल्यासमोर मांडत आहे:

**१)** **<u>भागभांडवल:</u>** अहवाल वर्षामध्ये, संस्थेने ४ कोटी २० लाख किमतीचे भाग बायबॅक केल्यामुळे भागभांडवलामध्ये घट झाली आहे. ३१ मार्च २०२५ अखेर संस्थेचे भागभांडवल रु. ४० कोटी ४२ लाख आहे.

**२)** **<u>एकूण मालमत्ता:</u>** ३१ मार्च २०२५ अखेर, संस्थेची स्थावर मालमत्ता रु. १,१३५ कोटी ४० लाख इतकी नोंदली गेली आहे. मागील वर्षीची संस्थेची स्थावर मालमत्ता रु. १,०५८ कोटी ४३ लाख लाख होती.

**३)** **<u>उलाढाल:</u>** ३१ मार्च २०२५ अखेर, संस्थेची एकूण उलाढाल रु. ५,४६३  कोटी ०८ लाख आहे. तर मागील वर्षीची उलाढाल रु. ४,५९१ कोटी ०७ लाख होती.

**४)** **<u>घसारा:</u>** अहवाल वर्षामध्ये, घसारा रु. १५४ कोटी ०३ लाख असून मागील वर्षी रु. ११६ कोटी ८३ लाख होता.

५) अहवाल वर्षामध्ये एकूण रु. २२ लाख ७२ हजारांची रोपे देण्यात आली. रु. ०७ लाख ८२ हजारांचे ड्रीप बसवण्यात आले तसेच एकूण रु. ३ कोटी ४३ लाखांची खते वाटप करण्यात आली.

६) करारपद्धतीने कुक्कुटपालन या योजनेनुसार आपले संस्थेने १२,००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. या शेतकऱ्यांना या वर्षामध्ये जोपासना खर्च (growing charges) म्हणून एकूण रु. २२१ कोटी ८० लाख देण्यात आले आहेत.

यानंतर मा. चेअरमन, श्री. राजेंद्र दादा पवार साहेबांना विनंती करतो की, त्यांनी सभेला संबोधित करावे.

- **Chairman's Speech – Mr. Rajendra D. Pawar:**

नमस्कार, आपल्या संस्थेच्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे जमलेले सर्व सभासद, संचालक मंडळातील सदस्य, संस्थेचे सर्व ऑडिटर्स आणि इतर पदाधिकाऱ्यांचे स्वागत.

या सभेसंदर्भात, कंपनी सचिवांनी सांगितल्या प्रमाणे, कंपनी कायद्याच्या तरतुदींचे पालन करून, मागील वर्षी प्रमाणे, या वर्षी सुद्धा, संस्थेची, वार्षिक सर्वसाधारण सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून घेत आहोत.

आर्थिक वर्ष २०२४-२५ अखेर, संस्थेची उलाढाल, प्रथमच, ५,००० कोटींच्या पुढे गेली आहे. हे फक्त, संस्थेशी निगडित असलेल्या आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे आणि योगदानामुळे झाले आहे, त्यासाठी सर्वांचे मनःपूर्वक आभार.

मागील वर्षीच्या हंगामा मध्ये, साखर उद्योगाला बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागला होता, तरीही संस्थेने, महाराष्ट्र मध्ये सर्वाधिक गाळप केले होते. या वर्षी, पाऊस चांगला झाल्यामुळे, येणाऱ्या साखर हंगामा मध्ये सुद्धा गाळप मोठ्या प्रमाणावर करण्याचे उद्दिष्ट आहे.

पोल्ट्री उद्योगामध्ये, असंघटित तसेच लघु उद्योजकांची वाढ झाल्यामुळे पक्ष्यांचे अतिरिक्त उत्पादन (over placement) झाले याचा पोल्ट्री उद्योगावर वर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

संस्थेने 'देशी बर्ड' विभागाचीही सुरुवात केली आहे, जिथे नवीन जातीच्या कोंबड्यांसाठी बाजारपेठ तयार करण्याचा प्रयत्न आहे तसेच पशुखाद्य विभागाची सातत्यपूर्ण प्रगती सुरु असून, आगामी वर्षात, उत्तर भारतात, पशुखाद्य उद्योगाच्या विस्तारीकरणावर, संस्थेचा भर राहणार आहे.

मागील वर्षी, आपल्याशी सवांद सधनता, मी, शेतीसाठी AI टेक्नोलॉजीचा उल्लेख केला होता, गेल्या वर्षभरात सर्वच क्षेत्रांमध्ये AI टेक्नोलॉजीचा प्रामुख्याने वापर केला जात आहे. कृषि क्षेत्रामध्ये, AI टेक्नोलॉजीचा वापर, हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी तसेच उत्पादकता वाढविण्यासाठी उपयोग केला जाऊ शकतो.

AI टेक्नोलॉजी वापरुन, ऊस उत्पादक, ऊस उत्पादनात वाढ, सिंचनाच्या पाण्यात बचत, रासायनिक खतांच्या वापरात बचत तसेच कीड रोग नियंत्रण करू शकतात. यासाठी, माझी, शेतकरी बांधव व ऊस उत्पादकांना विनंती आहे की त्यांनी, शेती करताना, AI टेक्नोलॉजी चा जास्तीत जास्त वापर कसा करता येईल हे जाणून घ्यावे.

त्यासाठी VSI, KVK अशा संस्थांना भेट द्यावी तसेच याबाबत कोणत्याही मार्गदर्शनासाठी, मदतीसाठी, मी, रोहित दादा, आबा व संस्थेमधील इतर वरिष्ठ अधिकारी, आपल्यासाठी सदैव उपलब्ध आहोत.

येणाऱ्या काळात, व्यवसायांमध्ये बरीच आव्हाने अपेक्षित आहेत तरी विविध धोरणात्मक निर्णयांमुळे, आपल्या सर्वांच्या सहयोगाने, संस्थेची प्रगती आणि विस्तार पुढे चालू राहणार आहे.

त्यासाठी आपण सर्वजण, आपली भूमिका व जबादारी नुसार आपले योगदान देणार आहात याचा मला विश्वास आहे आणि आपले सहकार्य, विश्वास कायम रहावा अशी अपॆक्षा व्यक्त करतो.

पुन्हा एकदा आपल्या सर्वांचे आभार.

आपली व आपल्या कुटुंबाची काळजी घ्यावी..!!!
धन्यवाद...!!!

• **Voting Instructions – Mr. Devendra Kulkarni:**

चेअरमन साहेबांनी सभेला संबोधित केल्याबद्दल, सर्वांतर्फे, मी त्यांचे आभार मानतो.

ज्यांनी ई-मतदान मार्फत मतदान केलेले नाही, त्यांनी एन.एस.डी.एल च्या संकेत स्थळावर वर जाऊन आपले मतदान नोंदवावे. ई-मतदान ची लिंक चॅट बॉक्स मध्ये दिलेली आहे. ई-मतदान विषयी अधिक माहिती हवी असल्यास, सभा संपल्यानंतर कृपया कंपनीच्या शेअर्स डिपार्टमेंट मध्ये संपर्क साधावा.

सभासदांना काही प्रश्न असल्यास त्यांनी ते विचारावे, किंवा मीटिंग नंतर कंपनीच्या शेअर्स डिपार्टमेंट मध्ये संपर्क साधावा.

आजच्या सभे करिता आपण सर्वजण या विडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित राहिलात, त्याबद्दल मी आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो आणि आजची सभा संपल्याचे जाहीर करतो. धन्यवाद..!

---

**Meeting concluded at: 11:10 A.M. IST**